भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.४१९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/०५/२०१७

**१) समोरील दाराचा कोंढा तोडुन बेडरूम मधील आलमारीचे लॉकर तोडुन सोन्याचे दागीने व नगदी पैशाची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २९/०५/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ओमप्रकाश प्यारेलाल मोहबंसी रा. व्यंकटेश कॉलोनी तकीया वार्ड भंडारा हे आपले कुटुंबासह घराला ताला लावुन भावाकडे लग्नाला गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे घराचे समोरील दाराचा कोंढा तोडुन आत प्रवेश करून बेडरूममधील आलमारीचे लॉकर तोडुन त्या मधील १ सोन्याचा मंगळसुत्र ४.५ ग्रॅम, २ सोन्याच्या अंगठया १६ ग्रॅम, १ सोन्याची चैन १५ ग्रॅम, ४ सोन्याच्या बांगळया ३३.७१० ग्रॅम, २जोड सोन्याचे कानातील झुमके ५ ग्रॅम, सोन्याची कनोटी ५ ग्रॅम व नगदी ७०००/रू. असा एकुण २,८१,०००/रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि.उबाडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) समोरील दाराचा कुलुप तोडुन बेडरूम मधील कपाटातील स्टिलच्या डब्यात ठेवलेले सोन्याचे दागीने व नगदी पैशाची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २७/०५/२०१७ चे २१.१५ वा. ते २८/०५/२०१७ चे १७.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी शरद केवळराम खराबे वय ४१ वर्ष रा. समर्थ नगर लाखनी/ मुरमाडी हे आपले घराला ताला लावुन परिवारासह साडयाचे घरी पाहुणे म्हणुन गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे घराचे समोरील दाराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून बेडरूम मधील कपाटातील साडयामध्ये स्टिलचे डब्यात ठेवलेले ३ सोन्याचा मंगळसुत्र २५ ग्रॅम, १ सोन्याची नथ ३ ग्रॅम व नगदी ६५००/रू. असा एकुण ६५,५००/रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४५४,४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. टेभुर्णे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३) शेतातील मोटार पंपाला लावलेले इंडोजर्मनी कंपनीचे प्लॉस्टीक गोल पाईप चोरून नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २७/०५/२०१७ चे ०९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी मधुकर हरी साहुलकर वय ६६ वर्ष, रा. कोंढी याचे शेतात असलेल्या मोटार पंपाला लावलेले इंडोजर्मनी कंपनीचे प्लॉस्टीक गोल पाईप अंदाजे १५० ते २०० फुट लांबीचे किंमती ५०००/रू. माल कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन कापुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. जवाहरनगर येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. वालदे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

४) नाल्यावर लावलेली एलन कंपनीची मोटारपंप चोरून नेल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २७/०५/२०१७ चे १८.०० ते २८/०५/२०१७ चे ०८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी रवी रामभाऊ येळणे वय ३८ वर्ष, रा. जगनाडे चौक वरठी याचे शेतीला पाणी देण्यासाठी नाल्यावर लावलेली एलन कंपनीची मोटारपंप २ एचपी किंमती ५०००/रू. माल कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. वरठी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कुभंलकर पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

५) बोलेरो पिकप वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकल चालकास धडक मारुन जखमी करून व गाडीचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २९/०५/२०१७ चे ११.३० वा. दर. यातील फिर्यादी अंकुश दिलीप एकलारे वय २८ वर्ष रा. वसंत विहार नागपुर हा आपले ताब्यातील होडाई आय २० गाडी क्रमांक एमएच ३१ ईए ३२४७ ने साकोली कडुन सडक अर्जुनीकडे एन एच ०६ रोडने सेंदुरवाफा मार्गे जात असतांना साई बाबा रॉईस मिल कडुन येणाऱ्या यातील आरोपी वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे गाडीला धडक दिल्याने गाडीचे नुकसान करून फिर्यादीस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. साकोली येथे कलम २७९,३३७,४२७ भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

६) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे उभ्या असलेल्या ट्रक ला मागेहुन धडक मारुन दोन ईसम जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २८/०५/२०१७ चे २३.१५ वा. दर. यातील फिर्यादी निलकंठ प्रेमलाल पटले वय ३९ वर्ष रा. सितेपार जिल्हा गोंदिया ह.मु. भवानी नगर पारडी नागपुर हा ट्रक क्र. सीजी. ०७ सीए ५११७ व सोबत असलेला मजर अली खॉन याचा ट्रक क्र. सीजी. ०४/जेसी ९६१७ असे दोन्ही ट्रक चे कॅबीन मध्ये जेवन करित असतांना यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपने चालवुन ऊभ्या असलेल्या ट्रकला मागेहुन धडक मारून मजर अली खॉन यास जखमी करून व स्वत: तसेचे कन्डॅक्टर धर्मराज बेतवार वय २८ वर्ष रा. खामगांव यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. कारधा येथे कलम २७९,३३७, भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गौर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

७) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २८/०५/२०१७ चे १७.०० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन आमरोडवर सार्वजनीक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या ठिकाणी उभी करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पो.ना. खडसे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. साकोली येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. खडसे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

८) अवैध देशी दारु/ जुगार अडयावर धाडी . :–

दिनांक २९/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. भंडारा, जवाहरनगर, कारधा, करडी, तुमसर, गोबरवाही येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ११ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १५४ लिटर हातभट्टी दारु + ५३५ किलो सडवा साहित्य किंमती ४०,९३५/–रु. तसेच जुगारातुन किंमती १,३२८/–रु. असा एकुन किंमती ४२,२६३/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २९/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ६४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२ तीन सिटर वाहनांवरती १० केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.